RNI No. MAH-BIL/2009/31733
Reg. No. MH/MR/South-322/2010-12.

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-अ

, अंक ७४] सोमवार, डिसेंबर १७, २०१२/अग्रहायण २६, शके १९३४ [पृष्ठे ८
[ किंमत : रुपये १४.०० ]

## असाधारण क्रमांक १४९

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश**

## उच्च व तंत्र शिक्षण विभाग

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२/शिबीर कार्यालय, नागपूर.

दिनांक १४ डिसेंबर, २०१२.

**अधिसूचना**

**भारताचे संविधान—**

ांक : व्यशिअ-२०१०/(१५५/१०)/व्यशि-१.—भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३०९ खालील परंतुकान्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करून आणि अस्तित्वात असलेले संबंधित सर्व विद्यमान नियम, आदेश किंवा अनुदेश अधिक्रमित करून महाराष्ट्राचे राज्यपाल याद्वारे महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अधिपत्याखालील व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयातील **शासकीय तंत्र माध्यमिक शाळेतील, केंद्रातील पूर्व व्यावसायिक अभ्यासक्रमातील निदेशक, प्रमाणपत्र अभ्यासक्रमातील निदेशक**, गट-क पदाच्या सेवा भरतीचे विनियमन करणारे पुढील नियम करीत आहेत, जसे :—

१. या नियमांना उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अधिपत्याखालील व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयातील **शासकीय तंत्र माध्यमिक शाळेतील, केंद्रातील पूर्व व्यावसायिक अभ्यासक्रमातील निदेशक, प्रमाणपत्र अभ्यासक्रमातील निदेशक, गट-क** पदांचे (सेवाप्रवेश) नियम, २०१२.असे संबोधण्यात यावे.

२. या नियमांमध्ये संदर्भानुसार दुसरा अर्थ अभिप्रेत नसेल तर,

(अ) " विभाग " याचा अर्थ महाराष्ट्र शासनाचा उच्च व तंत्र शिक्षण विभाग ;

(ब) " पदविका " याचा अर्थ महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण परीक्षा मंडळ, मुंबई यांनी प्रदान केलेली पदविका किंवा शासन मान्यताप्राप्त स्वायत्त संस्थेतील पदविका ;

(क) " संचालनालय " याचा अर्थ व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय ;

(ड) " शासन " याचा अर्थ महाराष्ट्र शासन ;

(इ) " शासन मान्यता प्राप्त संस्था " याचा अर्थ शासनाने मान्यता दिलेल्या संस्था ;

(फ) " माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा " याचा अर्थ महाराष्ट्र माध्यमिक शिक्षण मंडळ आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या अधिनियम, १९६५ अन्वये प्रस्थापित केलेल्या विभागीय मंडळाने नियंत्रित केलेली माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा व यामध्ये शासनाने या परीक्षेत समकक्ष म्हणून घोषित केलेल्या इतर परीक्षा अंतर्भूत आहेत.

३. शासकीय तंत्र माध्यमिक शाळेतील आणि केंद्रातील **पूर्व व्यावसायिक अभ्यासक्रमातील निदेशक, गट-क** या पदावरील नेमणुका पुढील मार्गाने करण्यात येतील.—

(अ) औद्योगिक प्रशिक्षण संस्था आणि शासकीय तंत्र माध्यमिक शाळा आणि केंद्र यामध्ये गट-ड मधील पद धारण करणाऱ्या व गट-ड संवर्गात किमान तीन वर्षे नियमित सेवा पूर्ण केलेल्या आणि या नियमाच्या उपखंड (ब) (ii) व (iii) मध्ये नामनिर्देशनाने नियुक्तीसाठी विहित केलेली शैक्षणिक अर्हता आणि अनुभव धारण करणाऱ्या योग्य व्यक्तीच्या ज्येष्ठता अधीन पात्रता या आधारावर पदोन्नतीने,

किंवा

(ब) पुढील अटी पूर्ण करणाऱ्या उमेदवारांमधून नामनिर्देशनाने,

(i) ज्यांचे वय तेहतीस वर्षापेक्षा जास्त नाही,

(ii) ज्यांनी यांत्रिकी किंवा विद्युत अभियांत्रिकी किंवा व्यावसायिक किंवा संबंधित व्यवसायातील पदविका किमान द्वितीय श्रेणीमध्ये उत्तीर्ण ;

किंवा

(ii) ज्यांनी महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची संबंधित विषयातील व्यवसाय अभ्यासक्रमातील १०+२ स्तरावरील उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रम परीक्षा किंवा त्यांच्याशी समकक्ष परीक्षा किमान प्रथम श्रेणीत उत्तीर्ण केली आहे ;

किंवा

(ii) ज्यांनी सेंटर ऑफ एक्सलन्समधील संबंधित व्यवसायातील विशेषज्ञता मॉड्यूल मध्ये उत्तीर्ण केली आहे ;

किंवा

(ii) ज्यांनी संबंधित व्यवसायातील राष्ट्रीय व्यवसाय प्रमाणपत्र किंवा राष्ट्रीय शिकाऊ उमेदवारी प्रमाणपत्र धारण केले आहे.

आणि

(iii) ज्यांनी या नियमातील उपखंड (ब) (ii) मध्ये नमूद केलेली अर्हता धारण केल्यानंतर कोणत्याही उद्योगामध्ये किंवा शासकीय विभागामध्ये किंवा शासनाने स्थापित केलेल्या औद्योगिक उपक्रमामध्ये किंवा व्यापारी संस्थेमध्ये किंवा शासनाने स्थापन केलेले स्थानिक प्राधिकरण किंवा महामंडळ किंवा मंडळ यामध्ये जबाबदारीच्या पदावरील महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण परीक्षा मंडळाची पदविका धारकाच्या बाबतीत दोन वर्षे, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामधून संबंधित व्यवसायातील परीक्षा उत्तीर्ण होणाऱ्या उमेदवारांच्या बाबतीत ३ वर्षे व राष्ट्रीय व्यवसाय प्रमाणपत्र किंवा राष्ट्रीय शिकाऊ उमेदवारी योजना प्रमाणपत्र धारकाच्या बाबतीत ४ वर्षे इतका संबंधित क्षेत्रातील अनुभव धारण केला आहे :

परंतु असे की, विहित कालावधीचा अनुभव असणारे उमेदवार पुरेशा संख्येत जर उपलब्ध नसतील तर, अनुभव कालावधी एक वर्ष शिथिल करता येईल.

४. शासकीय तंत्र माध्यमिक शाळेतील/केंद्रातील प्रमाणपत्र अभ्यासक्रमातील निदेशक, गट-क या पदावरील नेमणुका पुढील अटी पूर्ण करणाऱ्या उमेदवारांमधून नामनिर्देशनाने करण्यात येतील.

(i) ज्यांचे वय तेहतीस वर्षापेक्षा जास्त नाही,

(ii) ज्यांनी यांत्रिकी किंवा विद्युत अभियांत्रिकी किंवा व्यावसायिक किंवा संबंधित व्यवसायातील पदविका किमान द्वितीय श्रेणीमध्ये उत्तीर्ण केली आहे ;

किंवा

(ii) ज्यांनी महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची संबंधित विषयातील व्यवसाय अभ्यासक्रमातील १०+२ स्तरावरील उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रम परीक्षा किंवा त्यांच्याशी समकक्ष परीक्षा किमान प्रथम श्रेणीत उत्तीर्ण केली आहे ;

किंवा

(ii) ज्यांनी सेंटर ऑफ एक्सलन्समधील संबंधित व्यवसायातील विशेषज्ञता मॉड्यूल मध्ये उत्तीर्ण केली आहे ;

किंवा

(ii) ज्यांनी संबंधित व्यवसायातील राष्ट्रीय व्यवसाय प्रमाणपत्र किंवा राष्ट्रीय शिकाऊ उमेदवारी प्रमाणपत्र धारण केले आहे.

आणि

(iii) ज्यांनी या नियमातील उपखंड (ब) (ii) मध्ये नमूद केलेली अर्हता धारण केल्यानंतर कोणत्याही उद्योगामध्ये किंवा शासकीय विभागामध्ये किंवा शासनाने स्थापित केलेल्या औद्योगिक उपक्रम किंवा व्यापारी संस्था यामध्ये किंवा शासनाने स्थापन केलेले स्थानिक प्राधिकरण किंवा महामंडळ किंवा मंडळ यामध्ये जबाबदारीच्या पदावरील, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण परीक्षा मंडळाची पदविका धारकाच्या बाबतीत दोन वर्षे, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामधून संबंधित व्यवसायातील परीक्षा उत्तीर्ण होणाऱ्या उमेदवारांच्या बाबतीत ३ वर्षे व राष्ट्रीय व्यवसाय प्रमाणपत्र किंवा राष्ट्रीय शिकाऊ उमेदवारी योजना प्रमाणपत्र धारकाच्या बाबतीत ४ वर्षे इतका संबंधित क्षेत्रातील अनुभव धारण केला आहे.

५. नियम ३ मध्ये नमूद केलेल्या पदावर पदोन्नती व नामनिर्देशनाने करावयाच्या नेमणूका १०:९० या प्रमाणांत करण्यात येतील.

६. नियम ३ व ४ मध्ये नमूद पदावर झालेल्या व्यक्तीला जर अगोदरच उत्तीर्ण झाली नसेल किंवा त्याला/तिला उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाली नसेल तर विभागीय परीक्षा आणि हिंदी व मराठी भाषा परीक्षा त्यासंबंधी केलेल्या नियमानुसार उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

७. नियम ३ आणि ४ मध्ये नमूद केलेल्या व्यक्तीस जर आवश्यकता वाटली तर कोणत्याही भारतीय संरक्षण सेवेमध्ये किंवा भारताच्या संरक्षणाशी निगडीत असलेल्या पदावर भारतात किंवा भारताबाहेर चार वर्षे चार वर्षापेक्षा कमी नाही इतक्या कालावधीसाठी (प्रशिक्षणासाठी घालविलेला कालावधी जमेस धरून) वेळोवेळी केंद्र शासनाने विहित केलेल्या अटीनुसार सेवा करावी लागेल.

८. नियम ३ आणि ४ मध्ये नमूद केलेल्या पदावर नियुक्त झालेल्या व्यक्तीस महाराष्ट्र शासनाच्या माहिती तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहित केलेले संगणक हाताळणी प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहील.

९. नियम ३ आणि ४ मध्ये नमूद केलेल्या पदावर नियुक्त केलेली व्यक्ती प्रादेशिक कार्यालय स्तरावर बदली होण्यास पात्र राहील.

१०. उपरोक्त नियमांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी सेवेची निकड लक्षात घेऊन जेव्हा आवश्यक असेल तेव्हा नियम-३ मध्ये नमूद पदावर पदोन्नतीने व नामनिर्देशनाने भरती करण्याचे जे प्रमाण विहित केले आहे ते प्रमाण शिथील करणे शासनाच्या मते आवश्यक वाटल्यास सदर प्रमाण शिथील करून शासनास नेमणुका करता येतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**संजय कुमार,**
प्रधान सचिव,
उच्च व तंत्र शिक्षण विभाग.

HIGHER & TECHNICAL EDUCATION DEPARTMENT

Mantralaya, Mumbai-400 032/Camp office, Nagpur.

Dated the 14th December, 2012.

*NOTIFICATION*

CONSTITUTION OF INDIA

No. VOC-2010/(155/10)/VE-1.—In exercise of the powers conferred by the provision to Article 309 of the Constitution of India, and in supersession of all existing rules, orders or instruments made in this behalf, the Governor of Maharashtra is hereby pleased to make the following rules regulating recruitment to the post of Instructor in Pre-Vocational Study Course and Instructor in Certificate Study Course, in the Government Technical School or Center, Group-C, in the Directorate of Vocational Education & Training under the Higher & Technical Education Department, Government of Maharashtra, namely :—

**1.** These Rules may be called the Instructor in Pre-Vocational Study Course and Instructor in Certificate Study Course, in Government Technical School or Center, Group-C, in the Directorate of Vocational Education and Training, under the Higher & Technical Education Department, (Recruitment) Rules, 2012.

**2.** In these rules, unless the context requires otherwise,

(a) " Department " means Higher and Technical Education, Department, of Government of Maharashtra ;

(b) " Diploma " means a Diploma awarded by the Maharashtra State Board of Technical Education, Mumbai or by the autonomous Institution recognized by the Government ;

(c) " Directorate " means Directorate of Vocational Education and Training ;

(d) " Government " means Government of Maharashtra ;

(e) " Recognised Institution " means an institution recognised by the Government ;

(f) " Secondary School Certificate Examination " means the Secondary School Certificate Examination conducted by a Divisional Board under the Maharashtra Secondary and Higher Secondary Education Boards Act, 1965 (Mah. XLI of 1965) and includes any other examination declared by the Government to be equivalent thereto.

3. Appointment to the post of Instructor in Pre-Vocational Study Courses in Government Technical Secondary School or Center, Group-C shall be made by either :—

(a) by promotion of a suitable person on the basis of seniority subject to fitness from amongst the persons holding the Group ' D ' post in Industrial Training Institute or Government Technical School in Directorate having minimum three years regular service in Group ' D ' cadre and possessing qualifications and experience prescribed for appointment by nomination in sub-clause (b) (ii) and (iii) of this rule ;

*OR*

(b) by nomination from amongst the candidates who,

(i) Are not more than thirty three years of age ;

(ii) possess Diploma in Mechanical or Electrical Engineering or Diploma in Vocational or in relevant trade at least in second class ;

*OR*

(ii) passed the Examination in Vocational Study Course in relevant subject in 10+2 level Higher Secondary Vacational Course or its equivalent examination in 1st class ;

*OR*

(ii) possess specialized module in Centre of Excellence in the relevant sector ;

OR

(ii) possess National Trade Certificate or National Apprenticeship in relevant trade ;

*AND*

(iii) possess practical experience in the relevant field of two years in case of diploma holder and three years in case of Higher Secondary Vocational Certificate holder and four years in case of National Trade Certificate or National Apprenticeship Certificate holder, in a responsible post in industry or in a Government Department or in an industrial undertaking or commercial concern or local authority or Corporation or Board established by Government, after acquiring the qualification mentioned in sub-clause (b) (ii) of this rule :

Provided that, if candidates with the prescribed period of experience are not available in sufficient number, the period of experience shall be relaxed by one year.

**4.** Appointment to the post of Instructor in Certificate Study Course in Government Technical High School or Center shall be made by nomination from amongst candidates who :—

(i) are not more than thirty three years of age ;

(ii) possess Diploma in Mechanical or Electrical Engineering or Diploma in Vocational or in relevant trade at least in second class ;

*OR*

(ii) passed the examination in Vocational Study Course in 10+2 level Higher Secondary Vocational Course or its equivalent examination in first class :

*OR*

(ii) possess specialized module in Centre of Excellence in the relevant sector :

*OR*

(ii) possess National Trade Certificate or National Apprenticeship Certificate in relevant trade ;

*AND*

(iii) possess practical experience in the relevant field of two years in case of Diploma holder and three years in case of Higher Secondary Vocational Course Certificate holder and four years in case of National Trade Certificate or National Apprenticeship Certificate holder, in a responsible post in any industry or in a Government Department or in an industrial undertaking or commercial concern institution or local authority or Corporation or Board established by Government, after acquiring the qualification mentioned in sub-clause (a) (ii) of this rule :

Provided that, if candidates with the prescribed period of experience are not available in sufficient number, the period of experience shall be relaxed by one year.

**5.** Appointment to the post mentioned in rule 3 by promotion and nomination shall be made in the ratio of 10:90.

6. A person appointed to the post, mentioned in rule 3 and 4 shall be required to pass the Departmental examination and examination in Hindi and Marathi languages according to the rules made in that behalf, unless he/she has already passed, or has been exempted from passing those examinations.

7. A person appointed to the post mentioned in rule 3 and 4 shall, if so required be liable to serve in any Defence Service of India or a post connect with the Defence of India, anywhere in or outside India for a period of not less than four years (inclusive of the period spent in training, if any) on such conditions as may be determined from time to time by the Government of India.

8. A person appointed to the post mentioned in rule 3 and 4 should possess a Certificate in Computer Operation prescribed by the Directorate of Information Technology, of Government from time to time.

9. A person appointed to the post mentioned in rule 3 and 4 shall liable for transfer on regional level.

10. Notwithstanding anything contained in these rules if in the opinion of Government, the exigencies of service so require, Government may, wherever necessary make appointment to the post mentioned in rule 3 in relaxation of the ratio prescribed in these rules for recruitment by promotion and nomination.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SANJAY KUMAR,
Principal Secretary,
Higher & Technical Education Department.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT PRESS, CIVIL LINES, NAGPUR 440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004.